महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक 10036, मुंबई 400 001.

WWW.DVET.GOV.IN e-mail:desk4@dvet.maharashtra.gov.in Phone No.22621008/22620191/Fax No 22675628

**परिपत्रक** ( E-mail ) क्रमांक :- ४/व्हीओसी/२०१७-१८/९४

**अत्यंत महत्वाचे / कालमर्यादीत** दिनांक :- १० एप्रिल २०१७

प्रति,

१) सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

२) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,
सर्व.

विषय :- + २ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय (HSC Vocational) अभ्यासक्रमांच्या प्रवेशाबाबत.

संदर्भ :- १) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवेश-२०१६/(१८०/१६)/एसडी-२, दि.७.१.२०१७.
२) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीओसी-२०१५/प्र.क्र.९६/व्यशि-४, दि.२७.११.२०१५.
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग-व्हीओसी-२०१४/१२८/प्र.क्र.३५/व्यशि-४, दि.२७.३.२०१४.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक ३ अन्वये उच्च माध्यमिक जुने व्यवसाय अभ्यासक्रम पुनर्रचित करुन नवीन २० सुधारित व्यवसाय अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून सुरु करण्यांत आलेले आहेत तसेच संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक (२) अन्वये उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नवीन सुधारित मानकांना मान्यता देण्यांत आलेली आहे. त्यानुसार इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी, मेकॅनिकल टेक्नॉलॉजी, ऑटोमोबाईल टेक्नॉलॉजी, कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी, ऑप्थॅल्मिक टेक्निशियन, रेडिओलॉजी टेक्निशियन, मेडिकल लॅबोरेटरी टेक्निशियन या आठ व्यवसाय अभ्यासक्रमाच्या एका तुकडीची प्रवेश क्षमता ३० एवढी करण्यांत आलेली असून उर्वरित बारा व्यवसाय अभ्यासक्रमाच्या एका तुकडीची प्रवेश क्षमता ४० एवढी करण्यांत आलेली आहे.

..२/-

+ २ एस.एच.सी. व्होकेशनलची प्रवेश प्रक्रिया सन २०१६-१७ पर्यन्त Offline पध्दतीने होत होती. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवेश-२०१६/(१८०/१६)/एसडी-२, दि.७.१.२०१७ अन्वये मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्हयातील मुंबई महानगर विकास प्राधिकारणे (MMRDA) क्षेत्रातील तसेच पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील इ. ११ वीचे प्रवेश Online करण्याबाबत सुधारित कार्यपध्दती अवलंबिण्याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यांत आलेल्या आहेत. यानुसार इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया मुंबई महानगर विकास प्राधिकारणे (MMRDA), पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासोबतच सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद या महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयात लागू राहतील.

विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक व औरंगाबाद हे उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून नोंदणी अर्जामध्ये नमूद केलेली माहिती उदा. शाखानिहाय तुकडया,अनुदानित, विना-अनुदानित, कायम विना-अनुदानित (स्वयंअर्थसहाय्यित) वर्गनिहाय व शाखानिहाय विद्यार्थी प्रवेश क्षमता, कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये उपलब्ध असलेले विषय इत्यादी तपासून शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी निश्चित केलेल्या ऑनलाईन सेवा पुरवठादारास विहित कालमर्यादेत उपलब्ध करुन देणार आहेत. तरी आपण आपल्या अधिपत्याखालील + २ एस.एच.सी. व्होकेशनल अभ्यासक्रम राबविण्या-या सर्व संस्थांची सर्वकष माहिती शिक्षण उपसंचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांना विहित कालावधीत उपलब्ध करुन देण्यांत यावी. विहित कालमर्यादेत ज्या संस्थांची माहिती शिक्षण उपसंचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांना प्राप्त न झाल्यास त्या संस्थांची नोंद Online प्रक्रियेत होणार नाही. सदरहू माहिती पुरविण्यास विलंब झाल्यास त्याची सर्व जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहील याची आपण कृपया नोंद घ्यावी.

तरी आपण आपल्या अधिपत्याखालील + २ एस.एच.सी. व्होकेशनल अभ्यासक्रम राबविण्या-या सर्व संस्थांना याबाबत अतीतात्काळ कळविण्यांत यावे. तसेच शासन निर्णय क्रमांक (२) अन्वये सुधारित अभ्यासक्रमांची नांवे व प्रवेश क्षमता इ. माहिती अचुकपणे भरण्याबाबतची दक्षता घ्यावी. याबाबतचा अहवाल उलटटपाली संचालनालयास सादर करावा.

( एस. एम. हस्ते )
प्र. संचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
म.रा., मुंबई-१.

प्रत :- + २ एस.एच.सी. व्होकेशनल अभ्यासक्रम राबविण्या-या सर्व संस्था (ई-मेल द्वारे) (प्रा.का. तसेच जि.व्य.शि. व प्रशि. अधिकारी यांचेमार्फत.)